# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २७/०८/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. नरखेड** :– दि. २५/०८/२०२२ रोजी पीडित/फिर्यादी वय २० वर्ष हीने पोस्टे शेघाट येथे रिपोर्ट दिली की, आरोपी नामे– पूनित वसंतराव वैद्य, वय २३ वर्ष, रा. मोवाड ता. नरखेड जि. नागपूर याचे सोबत नोव्हेंबर २०२० पासुन ओळखत असुन आरोपीने दिनांक १० मे २०२२ चे १५.०० वा. ते १५.३० वा. दरम्यान त्याचे घरी मोवाड येथे बोलावुन 'तु मला खुब आवडते, मला तुझ्या सोबत लग्न करायचे आहे' असे म्हणुन आरोपीने त्याचे राहते घरी संमती शिवाय शारीरिक संबध ठेवले. तसेच त्यानंतर सुध्दा मोवाड येथील मित्राचे घरी तसेच गणेशपुर येथील शेत शिवारामध्ये लग्नाचे आमिष दाखवुन वारंवार शारीरिक संबध ठेवले. त्यानंतर पीडितेने आरोपी सोबत बोलने बंद केले असता तिला शिवीगाळ करुन तिचे व आरोपीचे एकत्र काढलेले फोटो व्हायरल केल्याची धमकी दिली. अशा पीडितेच्या रिपोर्ट वरुन पोस्टे शेघाट जि. अमरावती येथे आरोपी विरुध्द अप क्र. २६२/२०२२ कलम ३७६(२)(एन),५०४,५०६ भादवी अनव्ये गुन्हा नोंद केलेला असुन सदर गुन्हाचे घटनास्थळ पोस्टे नरखेड हद्दीतील मौजा मोवाड येथील असल्याने गुन्हाची डायरी पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांचे कडुन पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांना प्राप्त होवुन गुन्हाची डायरी पोस्टे नरखेड येथे दिनांक २६/०८/२०२२ रोजी प्राप्त झाल्याने पोस्टे नरखेड अप क्र. ३४०/२०२२ कलम ३७६(२)(एन) ,५०४,५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद करुन तपास आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री गिन्हासे हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. सावनेर**:– दिनांक २६/०८/२०२२ रोजी अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १४ वर्ष ही पोळ्याच्या सणाला लागनाऱ्या बेलाचे पाते आणनेसाठी मौनिबाबा दरगा कडे गेली होती. बेलाचे झाडाचे पाते तोडुन परत येत असता दुपारी ०२/३० वा. चे सुमारास आरोपी नामे– मधु दुर्गिया लाउतकर वय ५१ वर्ष, रा. वार्ड क्र. २ गुजरखेडी ता. सावनेर हा मागुन आला तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ) भादंवी. सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सोनाली रासकर मो.क्र ९०८२१९६०८० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**